127

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३०/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीईक्यू- ०२२२ / प्र.क्र.३७३ / पोल-४, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** राज्य पोलीस दलातील सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीईक्यू- ०२२२ / प्र.क्र.३७३ / पोल-४, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३. अन्वये वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायाची प्रत यासोबत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी संलग्न केली आहे.

२. तरी, सदर पत्रानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १९-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त विभाग" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२

Email ID :pol4.home@maharashtra.gov.in

---

क्रमांक: पीईक्यू-०२२२/प्र.क्र.३७३/पोल-४ दिनांक : २९ ऑगस्ट, २०२३.

प्रति,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

**विषय :-** राज्य पोलीस दलातील सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/ १९-अ/वाहने/निकामीकरण २०२०-२१/४९/२०२२,दि.२६.०४.२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्य पोलीस दलातील सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने सदर प्रस्तावावर खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१) राज्य पोलीस दलाकडील वाहनांची सदयस्थिती सोबत जोडलेल्या तक्त्यात उपलब्ध करुन दयावी.

२) आपल्या कार्यालयाने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात दि.१८.१०.२०२२ च्या पत्रातील परिच्छेद २ मध्ये निर्लेखित वाहनांची संख्या वाहन प्रकार निहाय सादर केली आहे. आपल्या कार्यालयाच्या दि.०६.०४.२०२३ च्या पत्रान्वये सन २०२०-२१ मध्ये निर्लेखित करण्यात आलेल्या नमूद वाहन संख्येची माहिती सोबत सादर केली असून त्यात तफावत असल्याचे दिसून येते. उदा. मोटार सायकल प्रकारातील ४५८ वाहने २०२०-२१ मध्ये निर्लेखित करण्यात आली असल्याचे आपल्या कार्यालयाच्या दि.१८.१०.२०२२ च्या पत्रान्वये नमूद केले आहे. तथापि, आपल्या कार्यालयाच्या दि.०६.०४.२०२३ च्या पत्रान्वये सोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन ४१९ वाहनांचे क्रमांक सादर केले आहेत. तसेच, ट्रक प्रकारातील केवळ ०२ वाहनांचे क्रमांक आपल्या कार्यालयाने सादर केले असून ०५ ट्रकची खरेदी प्रस्तावित केली आहे. याबाबत, आपल्या कार्यालयाने पडताळणी करुन अचूक माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वयंस्पष्ट खुलाश्यासह सादर करावी.

३) कार प्रकारातील २१ वाहने, प्रति नग रु.१०.०० लक्ष किंमत मर्यादेत खरेदी करण्याचे विभागाने प्रस्तावित केली आहे. सदरची वाहने ज्या अधिकाऱ्यांकरीता खरेदी करावयाची आहेत त्यांचे पदनाम, कार्यालयाचे नाव व अनुज्ञेय किंमत मर्यादा यांची माहिती सादर करावी.

४) वाहन प्रकारनिहाय विभागाने प्रतिवाहन किंमत विभागाने प्रस्तावात नमूद केलेली आहे. तथापि, याबाबत विभागाने दरपत्रके नस्तीवर जोडलेली नाहीत.

५) आपल्या कार्यालयाने सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात दि.१८.१०.२०२२ च्या पत्रातील परिच्छेद



Scanned with CamScanner

२ मधील तपशिलात निर्लेखित वाहनांची संख्या वाहन प्रकार निहाय सादर केली असून जीप प्रकारातील ५९३ वाहने, एसी लाईट व्हॅन, बीडीडीएस व्हॅन २३ वाहने, बुलेटप्रुफ कॅरिअर फॉर क्युआरटी ०७ वाहने, ॲम्ब्युलन्स प्रकारातील ३४ वाहने, प्रिझन व्हॅन ९ वाहने व इतर १५४ वाहने अतिरिक्त असल्याचे आपल्या कार्यालयाने नमूद केले आहे. सदरची वाहने वाहन आढाव्यातील अनुज्ञये संख्येपेक्षा अतिरिक्त असण्याची कारणे व ती कोठून उपलब्ध झाली याबाबत सविस्तर खुलासा सादर करावा.

२. उपरोक्त वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाने कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(सुधाकर यादव)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**सहपत्र:** सोबत जोडले आहे

**प्रत:**- निवड नस्ती (पोल-४)

Scanned with CamScanner